# विचारांचे आदनप्रदान ही
# सामाजिक आरोग्याची खूण !

महाराष्ट्र फाउंडेशनचा वैचारिक क्षेत्रातील लेखनाबद्दल दिला जाणारा यंदाचा 'जीवन गौरव पुरस्कार' नम्रतापूर्वक स्वीकारत असताना मला आनंद होत आहे हे कबूल केले पाहिजे. मी महाराष्ट्र फाउंडेशनचे आणि या पुरस्कारासाठी माझी निवड करणारांचे मनःपूर्वक आभार मानतो. विचारवंत आणि प्रबोधक म्हणून महाराष्ट्र ज्यांची आजही आदरपूर्वक आठवण काढतो त्या मेघयाम पुंडलिक रेगे यांना प्रथमतः आपण हा पुरस्कार दिला होता. आज तो स्वीकारताना रेग्यांसारख्या ज्ञानऋषीचे स्मरण झाले म्हणजे त्या तुलनेने आपण किती लहान आहोत याचीही जाणीव मला मनोमन होते व मनावरचे ओझे आणखी वाढते.

आज मला आठवण होती आहे ती माझ्या वडिलांची. हैदराबाद संस्थानच्या मुक्तिलढ्यात भाग घेताना त्यांना मुख्यतः ज्या शिक्षा झाल्या त्या होत्या त्यांनी केलेल्या भाषणाबद्दलच्या. निजामाच्या राज्यातील अनिर्बंध कारभार, जुलुमी कायदे यांच्याविरुद्ध लोकमत जागृत करण्यासाठी ते काम करत होते. ज्यांना ते संबोधित करू इच्छित होते तो समाज त्या काळात लिखित आणि मुद्रित शब्दव्यवहाराशी एवढा परिचित झालेला नव्हता. मुख्य भर बोलण्यावरच होता. संस्थानात अनुभवास येणारे सत्य ते सांगत होते. पण सत्य सांगण्याचे स्वातंत्र्य त्यावेळी नव्हते. तुरुंगात असताना सत्याग्रही तरुण मुलांना ते विविध राजकीय प्रवाहाची ओळख करून देत. हुकुमशाही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष अस्तित्वात असते तेव्हा वातावरणात एक प्रकारचे कोंदलेपण असते. तसे ते त्यावेळी होते. हे वातावरण खुले करण्याचा प्रयत्न स्वातंत्र्याचे आणि स्वतंत्र विचारांचे समर्थक त्यावेळी करत होते. त्यात अल्पसा भाग असणाऱ्या माझ्या वडिलांची आठवण मला होणे स्वाभाविक आहे.

महाराष्ट्रात विचारवंतांची एक मोठी परंपरा आहे. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, न्या. महादेव गोविंद रानडे, म. जोतिराव फुले, गोपाळ गणेश आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक विचारवंतांनी नवे विचार मांडले, समाजाला मार्गदर्शन केले आणि काहींनी तर त्याचे कृतिशील नेतृत्वही केले. नंतरच्या काळात समाजाच्या स्थितीगतीचा विचार करावयाचा आणि आपली मते स्पष्टपणे मांडावयाची ही परंपरा राखणारे अनेक विचारवंत झाले आणि त्यांनी ही परंपरा कायम ठेवली. विवनाथ काशीनाथ राजवाडे, विठ्ठल रामजी शिंदे, श्रीधर व्यंकटेश केतकर, विनोबा भावे, आचार्य शं.द. जावडेकर, आचार्य स.ज. भागवत अशी काही नावे सहज आठवतात. त्यांनी समाजहिताचा विचार केला आणि परखड मार्गदर्शन केले आणि पुन्हा सत्तेची किंवा कोणत्याच अधिकाराची लालसा बाळगली नाही. त्यांचे सगळेच विचार सगळ्यांनीच स्वीकारले असे झाले नाही, परंतु या विचारांनी वाट मोकळी केली. प्रत्येक माणसाला स्वतंत्रपणे विचार करण्याचा अधिकार आहे, तो विचार सांगण्याचाही त्याला अधिकार आहे. प्रत्येक विचार किंवा विधान तपासून घेऊन, त्याची चिकित्सा करूनच त्यावर विवास ठेवावा असे ठरवण्याचाही त्याला अधिकार आहे. समाजाच्या स्थितीविषयी आणि पुढच्या मार्गक्रमणाच्या दिशेविषयी एक विचारमंथन चालू असावे आणि त्यात आपणही सहभागी असावे, असे त्याला वाटण्याचा अधिकार आहे. विचारांचे खुले आदानप्रदान ही समाजाच्या आरोग्याची एक खूण आहे.

विचारांची ही देवाणघेवाण काहींना नको असते. ती थांबवण्याचा साधासरळ उपाय म्हणजे विशिष्ट विचारांना आणि ते प्रगट करणाऱ्या माध्यमांना बंदी करणे. अनेकवेळा सत्ताधारी हा उपाय योजतात. पण कायद्याने असा प्रतिबंध करणे ही नाही म्हटले तरी लोकांत अप्रिय होणारी गोष्ट आहे. लोक स्वखुशीने विचार करण्याचा आपला

अधिकार सोडून देतील, असा उपाय काही हुकुमशाह अवलंबितात आणि लोक अत्यंत आनंदाने विचार करणे सोडून देतात. वंश, धर्म, जात, भाषा किंवा एखादे सांस्कृतिक वैशिष्ट्य याचा अतिरेकी अभिमान लोकांच्या मनात रुजवला, त्याला खतपाणी घातले म्हणजे त्याच्या आधारे सामान्य माणसे विचार करण्याचा आणि इतरही अधिकार स्वखुशीने सोडून देतात. हिटलरने जर्मन आर्यवंशाबद्दलचा अभिमान पराकोटीला नेला त्याचबरोबर ज्यूद्वेषाचे विष भिनवले. परिणाम असा झाला की, वांशिक अहंतेत खोल बुडालेल्या लोकांनी स्वतंत्र विचार करण्याचे थांबवले. ते सगळे काम हिटलर आणि त्याच्या सहकाऱ्यांना सुपूर्द केले. हे सगळे निवडणुकीच्या मार्गाने सत्तेवर येऊन नाझींनी साध्य केले. मानवी स्वभावातील दुराभिमान आणि द्वेष या स्वभावदोषांचा वापर करून लोकांना स्वखुशीने आपले समर्थक कसे करता येते याचे एक उदाहरणच त्यामुळे जगाला पहायला मिळाले. आपल्या सुदैवाने सर्व दिशांनी नवे विचार येऊ द्या, असे उदारपणे सांगणाऱ्या भारतीय संस्कृतीची आपल्याला परंपरा लाभली आहे आणि तिचे स्मरण आपण सतत केले पाहिजे.

सार्वजनिक जीवनाविषयीच्या कुतुहलामुळे यात निर्माण झालेली अनेक मोठी माणसे मा आदराने पाहिली. त्यांना जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांचे निष्ठापूर्ण जीवन, सत्तेसारख्या मोहापासून किंवा सुखवस्तू जीवनापासून दूर राहण्याची त्यांची वृत्ती, एखाद्या ध्येयासाठी समर्पणवृत्तीने काम करीत राहण्याची त्यांची तयारी या सर्वांचा एक खोल परिणाम माझ्या मनावर झाला. या माणसांचे जीवन जाणून घेताना माझ्या मनात काही प्रश्न निर्माण होत. लोकशाही व्यवस्थेत आपल्याला सत्तास्थाने मिळणार नाहीत, हे माहीत असूनही लोकशाहीचा आग्रह काहींनी का धरला? स्वातंत्र्यानंतरसुद्धा समतेच्या लढ्यात संघर्षाचे खडतर जीवन काहींनी का स्वीकारले? आपल्या धर्मावरील अतुट श्रद्धेने देशापासून हजार मैल दूर येऊन प्रतिकुल परिस्थितीत आपले आयुष्यही प्रॉटेस्टन्ट मिशनऱ्यांनी का धोक्यात घातले? या प्रनांची उत्तरे देणारी कारणे स्वतंत्रपणे सांगता आली असती, परंतु मला या माणसांच्या व्यक्तित्वाचा शोधा घ्यावा म्हणजे त्यांच्या जीवननिष्ठा आपोआप स्पष्ट होतील, असे वाटले आणि मी त्यांची व्यक्तिचित्रे लिहिली. ही व्यक्तिचित्रे त्या त्या माणसांचा शोध आहे तसाचा तो त्यांनी अंगीकारलेल्या विचारपरंपरेचाही शोध आहे, असे मला वाटले.

राजकारणात पुष्कळवेळा सोयीचा इतिहासच आपण पुनःपुन्हा सांगतो. ज्या एकोणिसाव्या शतकाने आधुनिक महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनाचा पाया रचला त्या शतकात झालेल्या अनेक विचारवंतांच्या कामाला आपण विसरूनच गेलो आहोत म्हणून मी ‘तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ’ लिहिले. सर्वसंगपरित्याग केलेल्या संन्याशाला स्वातंत्र्याच्या लढ्यात आपण उतरावे असे का वाटले याचा शोध घेण्यासाठी मी ‘कर्मयोगी संन्यासी’ लिहिले. धर्माच्या चौकटीत राहूनसुद्धा सुधारणांचा प्रयत्न कसा केला गेला याचा विचार करण्यासाठी मी गांधीजींपासून प्रेरणा घेणाऱ्या केवलानंद आणि तर्कतीर्थ या गुरुशिष्याबद्दल लिहिले.

आज महाराष्ट्राची वैचारिक परंपरा फार क्षीण झाली आहे, अशी तक्रार आपण नेहमी करतो आणि ती खरीही आहे. समाज जेव्हा जखडलेला असतो, त्याची प्रगती अशक्य झालेली असते किंवा पुढील मार्गक्रमणाबद्दल जेव्हा त्याच्या मनात संभ्रम असतो, अशावेळी समाजाबद्दल विचार करणारे (ज्यांना आपण विचारवंत म्हणतो) नवे विचार मांडतात, विरोधाला धैर्याने तोंड देतात. आज समाजापुढचे प्रश्न संपलेत असे नाही, पण मग वैचारिक वाङ्मय कमी का झाले आहे? कोणाचेही नवे विचार ऐकण्याची इच्छाच आता समाजात उरलेली नाही का मिळालेल्या सुखासीनतेत किंवा आत्मसमाधानात तो एवढा गर्क आहे की त्याला नवा विचार करण्याची गरज वाटत नाहा? की समाजाने आपल्या खऱ्या प्रनांची विचारच करू नये, म्हणून अनेक भावनिक प्रश्न मुद्दाम निर्माण करून या वैचारिक प्रक्रियेला थांबवण्यात आले आहे? ज्यांनी समाजाला नवे आणि हितकारक विचार सांगितले त्या विचारवंतांचे लौकिक जीवन समृद्ध झाले नाही, परंतु त्यांच्याबद्दल समाजाच्या जाणत्या वर्गात अतीव आदर होता. आज असे का

होत नाही? पूर्वी होऊन गेलेल्या थोर माणसांच्या तोलामोलाची माणसे प्रत्येक काळात निर्माण होत नसतात. समाजात जर खुले वैचारिक वातावरण आणि सहिष्णुता असेल तर नवेनवे विचारवंत निर्माण होण्याची प्रक्रिया मात्र चालू राहते.

समता हे मूल्य आपण मानले आहे. प्रत्येक माणसाला विचार करण्याचे व तो प्रगट करण्याचे स्वातंत्र्य आहे, हा समतामूल्याचाच एक भाग आहे. राज्यघटनेत तर ते आहे, पण ते आपल्या जीवनात हाडीमाशी रुजले पाहिजे. न आवडणारे विचारसुद्धा शांतपणे ऐकून घेतले गेले पाहिजेत. हिंसा किंवा दहशत यामुळे ते विचार दडपून टाकण्याचा मोह होऊ नये असा स्वतंत्र विचारांचा आदर करणारा उदार समाज निर्माण व्हावा, ही इच्छा माझ्याप्रमाणेच तुम्हा सगळ्यांचीसुद्धा असणार. हा पुरस्कार या दिशेने काम करीत राहण्याची मला आठवण देणारा आहे, असे मी मानतो.

(महाराष्ट्र फाउंडेशनचा जीवन गौरव पुरस्कार
स्वीकारताना केलेले भाषण,
26 मार्च 2022)